=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

## प्रकरण सहावे

## प्राप्ती व खर्च

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

# प्रकरण सहावे

## प्राप्ती व खर्च

### ६:१ प्रस्तावना -

सदर प्रकरणात राधानगरी तालुक्यातील नमुना सर्वेक्षणांतर्गत शेतक-यांच्या उत्पन्न व खर्चाचे सविस्तर विवेचन केले आहे. संशोधन पध्दतीनुसार एकूण ७२ उत्तरदात्यांची निवड केली आहे. त्यापैकी बागायत स्तरातील गट क्र.१ मध्ये ४, २ मध्ये १२ तर ३ मध्ये ११ अशा एकूण ३७ आणि जिरायत स्तरातील गट क्र.१ मध्ये ५, २ मध्ये १६ आणि ३मध्ये २४ उत्तरदात्यांची निवड केली आहे. आणि १९७१-७२, १९७६-७७, व १९८५-८६ या कालावधीत शेतक-यांच्या एकूण प्राप्तीत व एकूण खर्चात आणि अनुषंगिक घटकात कसकसा बदल झाला हे पाहू.

### ६:२ प्राप्ती -

तक्ता क्र. ६:१ मध्ये पुढील निष्कर्ष मिळतात. बागायत स्तरातील पहिल्या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ मध्ये शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीत अनुक्रमे १.७७ १.४२ आणि २.५३ पटीने वाढ झाली. शेती उत्पादनाचा खर्च याच कालावधीत अनुक्रमे १.५०, १.६१ आणि २.४३ पटीने वाढला आहे. शेतीपासून मिळणा-या निव्वळ उत्पन्नाबाबत या कालावधीत अनुक्रमे १.८९, १.३९ आणि २.६४ पटीने वाढ घडून आली आहे. मात्र पशुधनापासून मिळणा-या निव्वळ प्राप्ती बाबत या कालावधीत अनुक्रमे ०.६९, ४.४० आणि ३.०५ पटीने वाढ झाली. बीगर शेती व्यवसायापासून मिळणा-या प्राप्तीबाबत या कालावधीत अनुक्रमे २.२१, १.२९ आणि २.८६ पटीने वाढ झाली. त्याचप्रमाणे कुटुंबातील निव्वळ एकूण उत्पन्नात या कालावधीत अनुक्रमे १.९९, १.३८ आणि २.७५ पटीने वाढ झाली आहे. वर्षातील एकूण उसणवारी किंवा कर्जे या कालावधीत अनुक्रमे १.५, ११.३३ आणि १७ पटीने वाढ झाली आहे.

तक्ता क्र. ६:१

शेतक-यांची प्राप्ती (रुपयामध्ये)

| अ.नं. प्राप्तीचे साधन | वर्ष | बागायत: गट क्र.१ २.५ एकरा-पर्यंत | बागायत: गट क्र.२ २.५ ते ५ एकर | बागायत: गट क्र.३ ५ एकरा-पेक्षा जास्त | जिरायत: गट क्र.१ २.५ एकरा-पर्यंत | जिरायत: गट क्र.२ २.५ ते ५ एकर | जिरायत: गट क्र.३ ५ एकरापेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. शेती उत्पादनाची स्थूल प्राप्ती | १९७१-७२ | २४५४० | ११०६७० | १९९७०५ | १६३५० | २८५२५ | ३६७०० |
| २. शेती उत्पादनाचा एकूण खर्च | | ७१९४ | ३१२४४ | ६१३६९ | १८९० | ३२३० | ५०५६ |
| ३. शेती पासून मिळणारे निव्वळ उत्पन्न | | १७३४६ | ७९४२६ | १३७८१६ | १४४६६ | ५७७७९ | १५३१२४ |
| ४. पशूधनापासून मिळणारी निव्वळ प्राप्ती | | १७६० | ७५२७ | ७४८० | ४४९५ | ८३८० | १३९०८ |
| ५. बीगर शेती व्यवसायापासून मिळणारी प्राप्ती | | १४२०० | १०४०० | ५००० | ३०० | १५०० | २७०० |
| ६. कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न | | ३३३०६ | ९७३५३ | १५०२९६ | १९२५५ | ६७६५९ | १६९७३२ |
| ७. वर्षातील उसणवारी/कर्ज | | २००० | ३७३०० | ४३००० | – | – | १४००० |
| १. शेती उत्पादनाची स्थूल प्राप्ती | १९७६-७७ | ४३६०० | १८४७५५ | ३२८५७० | ७८५६० | १५४९०० | २११३८० |
| २. शेती उत्पादनाचा एकूण खर्च | | १०८१६ | ४६३३२ | ९०९३० | २०७८१ | २९६६६ | ४६८७० |
| ३. शेती पासून मिळणारे निव्वळ उत्पन्न | | ३२७८४ | १३८४२३ | २३७६४० | २५२९५ | १२५२५९ | २८१९४४ |
| ४. पशुधनापासून मिळणारी निव्वळ प्राप्ती | | १२२० | १३३१५ | १७७४० | ४०१० | १३१४५ | ५०२५५ |
| ५. बीगर शेती व्यवसायापासून मिळणारी प्राप्ती | | ३१५०० | १७४०० | १३००० | ९३०० | ११००० | २०२०० |
| ६. कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न | | ६६५०४ | १६९१३८ | २६८३८० | ३८६०५ | १४९४०४ | ३५२३९९ |
| ७. वर्षातील उसणवारी/कर्ज | | ३००० | ४६७०० | ३७००० | – | २७५०० | १५००० |
| १. शेती उत्पादनाची स्थूल प्राप्ती | १९८५-८६ | ६२३२५ | २७७७८५ | ४७५३०० | २२४५६० | ४०१४३५ | ६३१५३६ |
| २. शेती उत्पादनाचा एकूण खर्च | | १७५१० | ७८१२४ | १४१८४५ | ७१६८१ | ११४३४१ | १८७०२७ |
| ३. शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न | | ४५८१५ | १९९६६१ | ३३३४५५ | ३१६४४ | १६४५०० | ४४५८१४ |
| ४. पशुधनापासून मिळणारी निव्वळ प्राप्ती | | ५३८० | ३८६१५ | ५०४७० | १६५२० | ३११७७ | ७१३९५ |
| ५. बिगर शेती व्यवसायापासून होणारे (मिळणारी) प्राप्ती | | ४०७०० | ३७००० | १७२०० | १७३०० | ४७६०० | ७२३०० |
| ६. कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न | | ११८९५ | २७५२७६ | ४०११२५ | ६५४६६ | २५२०७७ | ५८९५०९ |
| ७. वर्षातील उसणवार/कर्ज | | ३४००० | ६९००० | १२६००० | १८४०० | २६००० | ११६५०० |

जिरायत स्तरातील पहिल्या गटात अनुक्रमे शेतीउत्पादनाच्या स्थूल प्राप्तीबाबत अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे ४.८०, २.८९ आणि १३.७३ पटीने वाढ झाली आहे. शेती उत्पादनाच्या खर्चाच्या बाबतीत याच कालावधीत अनुक्रमे १०.९९, ३.४४ आणि ४.३८ पटीने वाढ झाली आहे. शेतीपासून मिळ-णा-या निव्वळ उत्पन्नाबाबत अनुक्रमे १.७४, १.२५ आणि २.१८ पटीने वाढ झाली. पशुधनापासून मिळणा-या निव्वळ प्राप्तीच्या बाबत या कालावधीत अनुक्रमे ०.८९, ४.११ आणि ३.६७ पटीने वाढ झाली. बीगर शेतीपासून मिळणा-या उत्पन्नाबाबतीत अनुक्रमे या काळात ३१, १.८६ आणि ५७.६६ या पटीने वाढ झाली. या कालावधीत कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न अनुक्रमे २.०० १.६९ आणि ३.३९ पटीने वाढले. मात्र वर्षातील उसणवारी/कर्जे फक्त १९८५-८६ साली १८,४०० रु.नी वाढल्याचे आढळते.

बागायत व जिरायत स्तरातील पहिल्या गटाबाबत शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीमध्ये प्रामुख्याने १९८५-८६ साली वृध्दीदर आढळतो, शेती उत्पादनाच्या एकूण खर्चाच्या बाबत स्थूलपणे १९७१-७२ मध्ये जिरायत स्तरातील पहिल्या गटातील एकूण खर्चाचे प्रमाण जादा पटीने आढळते. शेतीपासून मिळणा-या निव्वळ उत्पन्नाबाबत तुलणात्मक दृष्टया या तीन्ही कालावधीत जिरायत स्थरातील शेतक-यांच्या बाबतीत .५ पटीच्या आसपास घट आढळते. पशुधनापासून मिळणा-या प्राप्तीच्या बाबतीत १ पटीच्या आसपास वाढ आढळते. मात्र बीगर शेती व्यवसायापासून मिळणा-या प्राप्ती बाबत जिरायत स्तरातील पहिल्या गटातील अनपेक्षीत अशी वाढ झाल्याचे आढळते. (३१, १.८६ आणि ५७.६६ पटीने) याचे प्रमुख कारण म्हणजे मर्यादित धारणक्षेत्र व वाढत्या गरजा यातून अन्य उत्पन्न मिळवणारे व्यवसाय हातीघेणे होय. त्याच प्रमाणे नोकरी मिळवण्याकडे अधिक कल दिसून येतो. निव्वळ उत्पन्नाच्या बाबतीत या दोन्ही

स्तरातील पहिल्या गटाबाबत १ पटीच्या आसपास फरक आढळतो. तसेच वर्षातील ऊसणवारी/कर्जे याबाबत बागायत स्तरातील पहिल्या गटातील शेतक-याचे प्रमाण जादा आढळते. जिरायत स्तरातील फक्त ३ ऱ्या कालावधीत उदारउसणवारी अगर कर्जे आढळतात. अशा प्रकारे या दोन स्तरातील पहिल्या गटात स्थूलपणे एकूण प्राप्ती व अन्य घटकाबाबत आढावा घेताना बीगर शेती व्यवसायापासून मिळणा-या प्राप्तीत मूलग्रामी बदल आढळतो.

बागायत स्तरातील दुस-या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ मध्ये शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीत अनुक्रमे १.६६, १.५० व २.५१ पटीने वाढ झाली. शेती उत्पादनाच्या एकूण खर्चामध्ये या कालावधीत अनुक्रमे १.४८, १.६८ आणि २.५० पटीने वाढ झाली. शेती उत्पादनाच्या निव्वळ उत्पन्नाबाबत या कालावधीत अनुक्रमे १.७४, १.४४ आणि २.५१ पटीने वाढ झाली. पशुधनापासून मिळणा-या निव्वळ प्राप्तीत या कालावधीत अनुक्रमे १.७६, २.९० आणि ५.१३ पटीने वाढ झाली. बीगर शेतीपासून मिळणा-या उत्पन्नात अनुक्रमे १.६७, २.१२ २.१२ आणि ३.५५ पटीने वाढ झाली. तर कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न या कालावधीत १.७३, १.६२ आणि २.८२ पटीने वाढले आणि वर्षातील ऊसणवारी/कर्ज यामध्ये अनुक्रमे १.२५, १.४७ आणि १.८४ पटीने वाढ झाली.

जिरायत स्तरातील दुस-या गटामध्ये अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ मध्ये शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीमध्ये अनुक्रमे ५.४३, २.५९ आणि १४.०० पटीने वाढ झाली. शेती उत्पादनाच्या एकूण खर्चामध्ये या कालावधीत अनुक्रमे ९.१८, ३.८५ आणि ३५.३९ पटीने वाढ झाली. शेती उत्पादनाची निव्वळ प्राप्ती या कालावधीत अनुक्रमे २.१६, १.३१ आणि २.९४ पटीने वाढ झाली. पशुधनापासून मिळणा-या निव्वळ प्राप्तीत या कालावधीत १.५६, ३.०४ आणि ४.७७ पटीने वाढ झाली.

बीगर शेती पासून मिळणा-या प्राप्तीत या कालावधीत ७.३३, ४.३२ आणि ३१.७३ पटीने वाढ झाली. कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न या कालावधीत अनुक्रमे २.२०, १.६८ आणि ३.७२ पटीने वाढ झाली. तर वर्षातील उसणवारी किंवा कर्जे यामध्ये १९७६-७७ मध्ये २७५०० रु.ने तर १९७१-७२ ते १९८५-८६ मध्ये ०.९४ पटीने वाढ झाली.

बागायत आणि जिरायत स्तरातील दुस-या गटाबाबत शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीमध्ये १९७१-७२, १९७६-७७ आणि १९८५-८६ या तिन्ही वर्षी वृध्दर आढळतो. शेती उत्पादनाच्या एकूण खर्चाबाबतसुध्दा या दोन्ही स्तरामध्ये वाढ आढळून येतो. शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्नाच्या बाबतीत १९७१-७२ मध्ये वृध्दीदर तर १९७६-७७ मध्ये जिरायत स्तरात थोडी घट आढळते. आणि १९८५-८६ मध्ये पुन्हा वाढ आढळून येते. पशुधनापासून मिळणा-या प्राप्तीमध्ये १९७१-७२ मध्ये बागायत गटापेक्षा जिरायत गटात थोडी घट आढळते. मात्र १९७६-७७ वर्षी मात्र वाढ आढळते. तर १९८५-८६ मध्ये बागायत गटात जिरायत गटापेक्षा वाढ दिसून येते. बीगर शेतीपासून मिळणा-या प्राप्तीत बागायत घटापेक्षा जिरायत गटात अधिक वाढ आढळून येते. कुटुंबाचे निव्वळ एकूण उत्पन्न सुध्दा तीन्ही वर्षी बागायत स्तरापेक्षा जिरायत स्तरामध्ये अधिक असल्याचे दिसून येते. तर कर्जाच्या बाबतीत जिरायत स्तरापेक्षा बागायत स्तरामध्ये हे प्रमाण अधिक आढळते.

बागायत स्तरातील तिस-या गटामध्ये अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीत अनुक्रमे १.६४, १.४४ आणि २.३७ पटीने वाढ आढळते. तर शेती उत्पादनाचा एकूण खर्च या कालावधीत अनुक्रमे १.४८, १.५५ आणि २.३१ पटीने वाढ झाल्याचे दिसून येते. शेतीच्या निव्वळ उत्पन्नाबाबत अनुक्रमे या कालावधीत १.७२, १.४० आणि २.४१ पटीने वाढ झालेली

आढळते. पशुधनापासून मिळणाऱ्या प्राप्तीत अनुक्रमे २.३७, २.८४ आणि ६.७४ पटीने वाढ दिसून येते. बीगर शेती उत्पन्नाबाबत (यामध्ये नोकरी, अन्य व्यवसाय, दुकान, इ.चा समावेश होतो) अनुक्रमे २.६, १.३२ आणि ३.४४ पटीने वाढ झाली आहे. कुटुंबाचे निव्वळ एकूण उत्पन्न अनुक्रमे या कालावधीत १.७८, १.४९ आणि २.६६ पटीने वाढल्याचे आढळते. वर्षातील कर्ज किंवा उसनवारी अनुक्रमे या कालावधीत ०.८६, ३.४० आणि २.९३ पटीने वाढल्याचे दिसून येते.

जिरायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत शेती उत्पादनाच्या स्थूल प्राप्तीत अनुक्रमे ५.७५, २.९८ आणि १७.२० पटीने वाढ आढळते. तर शेती उत्पादनाच्या एकूण खर्चाबाबत या कालावधीत अनुक्रमे ९.२७, ३.९९ आणि ३६.९९ पटीने वाढ झाल्याचे दिसून येतो. शेतीपासून मिळणाऱ्या निव्वळ प्राप्तीत या कालावधीत अनुक्रमे १.८४, १.५८ आणि २.९१ पटीने वाढ आढळते. तर पशुधनापासून मिळणाऱ्या प्राप्तीत या कालावधीत अनुक्रमे ३.६१, १.४२ आणि ५.१३ पटीने वाढ झाली आहे. बीगर शेती व्यवसायापासून मिळणाऱ्या प्राप्तीत या कालावधीत अनुक्रमे ७.४८, ३.५७, आणि २६.७७ पटीने वाढ झाली आहे. तर कुटुंबाचे निव्वळ एकूण उत्पन्न या कालावधीत अनुक्रमे २.०७, १.६७, ३.४७ पटीने वाढ झाली आणि कर्ज किंवा उसणवारी मध्ये या कालावधीत अनुक्रमे १.०७, ७.७६ आणि ८.३२ पटीने वाढ आढळते.

बागायत व जिरायत स्तरातील या वर्षाची तुलना केली असता शेती उत्पादनाची स्थूल प्राप्ती व शेती उत्पादनाचा एकूण खर्च यामध्ये बागायत स्तरापेक्षा जिरायत स्तरातील वाढ अधिक पटीने असल्याचे आढळते. मात्र या कालावधीतील शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न मात्र दोन्ही गटामध्ये जवळ-पास समान आहे. म्हणजेच जिरायत स्तरामध्ये निव्वळ उत्पन्नातील वाट ही

स्थूल प्राप्ती व खर्चाच्या मानाने कमी असल्याचे आढळून येते. पशुधनापासून मिळणारी प्राप्ती १९७१ मध्ये जिरायत गटामध्ये अधिक होती. तर नंतरच्या वर्षामध्ये ती बागायत उस्तरामध्ये अधिक असल्याचे आढळते. बीगर शेतीपासून मिळणारी प्राप्ती मात्र जिरायत स्तरामध्ये बागायत स्तरापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. तर कुटुंबाचे एकूण निव्वळ उत्पन्न सुध्दा जिरायत स्तरात अधिक आढळते. आणि उसणवारी किंवा कर्जाचे प्रमाण जिरायत स्तरामध्ये अधिक असल्याचे आढळून येते. तसेच अलिकडच्या काळात तर त्याचे प्रमाण जास्त आढळते.

तक्ता क्र. ६:२

दर एकरी प्राप्ती (रुपयामध्ये)

| वर्ष | बागायत | | | | | | | | | जिरायत | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गट क्र. १ (२.५ एकरापर्यंत) | | | गट क्र. २ (२.५ ते ५ एकर) | | | गट क्र. ३ (५ एकरापेक्षा जास्त) | | | गट क्र. १ (२.५ एकरापर्यंत) | | | गट क्र. २ (२.५ ते ५ एकर) | | | गट क्र. ३ (५ एकरापेक्षा जास्त) | | |
| | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती | एकूण भुधारण क्षेत्र | एकूण प्राप्ती | दर एकरी प्राप्ती |
| १९७१-७२ | ७.२० | १७३४६ | २४०९.१६ | ४२.२० | ७९४२६ | १८८२.१३ | १०३.२० | १३७८१६ | १३३५.४२ | १०.०० | १४४६० | १४४६.० | ६६.०३ | ५७७१ | ८७५.०४ | २५८.३६ | १५३१२४ | ५९२.६७ |
| १९७६-७७ | ८.०० | ३२७८४ | ४०९८ | ४२.२० | १३८४२३ | ३२८०.१६ | १०३.२० | २३७६४० | २३०२.७१ | १०.०० | २५२९५ | २५२९.५ | ६६.०३ | १२५२५१ | १८९७ | २६०.३६ | २८१९४४ | १०८२.९० |
| १९८५-८६ | ८.०० | ४५८१५ | ५७२६.८७ | ४२.२० | १९१६६१ | ४३२१.६६ | १०३.२० | ३३३४५५ | ३२३१.१५ | १०.०० | ३१६४४ | ३१६४.४ | ६६.०३ | १६४५०० | २४९१.२१ | २५१.३६ | ४४५८१४ | १७७८.९० |

टीप - एकूण भूधारण क्षेत्राचे आकडे एकरमध्ये

......

अध्ययन क्षेत्रातील बागायत स्तरातील धारण क्षेत्राचे आणि जिरायत स्तरातील धारणक्षेत्राचे आकारमान आणि अनुसंगीक गटातील शेतीपासून मिळणारी निव्वळ प्राप्तीचा आधार घेवून ६:२ या तक्त्याच्या आधारे पुढील निष्कर्ष काढता येतील.

बागायत स्तरातील पहिल्या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे १.८९, १.३९ आणि २.६४ पटीने दर एकरी प्राप्तीत वाढ आढळते. मात्र जिरायत स्तरातील याच कालावधीत अनुक्रमे १.७४, १.२५ आणि २.१८ पटीने वाढ झालेली आहे. म्हणजेच या कालावधीत बागायत व जिरायत स्तरातील पहिल्या गटामध्ये तुलना केली असता एकंदरीत बागायत धारणक्षेत्रातील पहिल्या गटातील दर एकरी प्राप्ती जिरायत धारण क्षेत्रातील पहिल्या गटापेक्षा जादा आहे.

बागायत स्तरातील दुसऱ्या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे १.७४ १.४४ आणि २.५१ पटीने वाढ झाली आहे. मात्र जिरायत क्षेत्रातील याच कालावधीत आणि याच गटात अनुक्रमे २.१६, १.३१ आणि २.८४ पटीने दर एकरी प्राप्तीत वाढ झाली आहे. म्हणजेच बागायत व जिरायत क्षेत्राची तुलना केली असता बागायत स्तरातील दुसऱ्या गटातील दर एकरी प्राप्ती जिरायत धारण क्षेत्रातील दुसऱ्या गटापेक्षा १९७१-७२ व १९८५-८६ ला कमी आढळते. तर १९७६-७७ मध्ये बागायत गटाची दर एकरी प्राप्ती जिरायत गटापेक्षा जास्त आढळते.

बागायत स्तरातील तिसऱ्या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७ १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे

१.७२, १.४० आणि २.४१ पटीने दर एकरी प्राप्तीत वाढ आढळते. मात्र जिरायत स्तरातील याच कालावधीत आणि याच गटातील दर एकरी प्राप्तीत अनुक्रमे १.८४, १.५८ आणि २.९१ पटीने वाढ आढळते. म्हणजेच जिरायत स्तरातील दर एकरी प्राप्ती बागायत स्तरातील दर एकरी प्राप्तीपेक्षा जादा आढळते. याचे कारण जिरायत धारणक्षेत्रामध्ये निव्वळ जिरायत क्षेत्र नसून काही बागायत क्षेत्रसुध्दा आहे.

## तक्ता क्र. ६:३

### दर एकरी शेतीवरील खर्च (रुपयामध्ये)

| वर्ष | बागायत: गट क्र. १ (२.५ एकरापर्यंत) एकूण भूधारण क्षेत्र | बागायत: गट क्र. १ एकूण खर्च | बागायत: गट क्र. १ दर एकरी खर्च | बागायत: गट क्र. २ (२.५ ते ५ एकर) एकूण भूधारण क्षेत्र | बागायत: गट क्र. २ एकूण खर्च | बागायत: गट क्र. २ दर एकरी खर्च | बागायत: गट क्र. ३ (५ एकरापेक्षा जास्त) एकूण भूधारण क्षेत्र | बागायत: गट क्र. ३ एकूण खर्च | बागायत: गट क्र. ३ दर एकरी खर्च | जिरायत: गट क्र. १ (२.५ एकरापर्यंत) एकूण भूधारण क्षेत्र | जिरायत: गट क्र. १ एकूण खर्च | जिरायत: गट क्र. १ दर एकरी खर्च | जिरायत: गट क्र. २ (२.५ ते ५ एकर) एकूण भूधारण क्षेत्र | जिरायत: गट क्र. २ एकूण खर्च | जिरायत: गट क्र. २ दर एकरी खर्च | जिरायत: गट क्र. ३ (५ एकरापेक्षा जास्त) एकूण भूधारण क्षेत्र | जिरायत: गट क्र. ३ एकूण खर्च | जिरायत: गट क्र. ३ दर एकरी खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७१-७२ | ७.२० | ७१९४ | ९९९.१६ | ४२.२० | ३१२४४ | ७४०.३७ | १०३.२० | ६१६६९ | ५९७.५५ | १०.०० | १८९० | १८९ | ६६.०३ | २०७८१ | ३१४.७२ | २५८.३६ | ७१६८१ | २७७.४४ |
| १९७६-७७ | ८.०० | १०८१६ | १३५२.०० | ४२.२० | ४६३३२ | १०९७.९१ | १०३.२० | ९०९३४ | ८८१.१४ | १०.०० | ३२३० | ३२३ | ६६.०३ | २९६६६ | ४४९.२८ | २६०.३६ | ११४३४१ | ४३९.१६ |
| १९८५-८६ | ८.०० | १७५१० | २१८८.७५ | ४६.२० | ७८१२४ | १६९०.९१ | १०३.२० | १४१८८५ | १३७४.४६ | १०.०० | ५०५६ | ५०५.६ | ६६.०३ | ४६८७० | ७०९.८२ | २५९.३६ | १८७०२७ | ७२१.१० |

टीप - एकूण भूधारण क्षेत्राचे आकडे एकरमध्ये

अध्ययन क्षेत्रातील बागायत स्तरातील धारणक्षेत्र आणि जिरायत स्तरातील धारणक्षेत्राचे आकारमान आणि अनुसंगिक गटातील एकूण खर्चाचा आधार घेवून तक्ता क्र.६:३ मधून पुढील निष्कर्ष सांगता येतात.

बागायत स्तरातील पहिल्या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे १.५०, १.६१ आणि २.४३ पटीने दर एकरी खर्चात वाढ झाली आहे. मात्र जिरायत स्तरातील याच कालावधीत १.७०, १.५६ आणि २.६७ पटीने दर एकरी खर्चात वाढ झाली आहे. म्हणजेच या कालावधीत बागायत व जिरायत स्तरातील पहिल्या गटामध्ये तुलना केली असता एकंदरीत जिरायत स्तरातील पहिल्या गटाचा दर एकरी खर्च बागायत स्तरातील पहिल्या गटापेक्षा जादा आहे.

बागायत स्तरातील दुस-या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे १.४८, १.६८ आणि २.५० पटीने दर एकरी खर्चात वाढ झाली आहे. मात्र जिरायत स्तरातील याच कालावधीत व याच गटातील दर एकरी खर्च अनुक्रमे १.४२, १.५७ आणि २.२५ पटीने वाढला आहे. म्हणजेच बागायत स्तरातील दर एकरी खर्च आणि जिरायत स्तरातील दर एकरी खर्च यांची तुलना केली असता बागायत स्तरातील दुस-या गटाचा दर एकरी खर्च जिरायत स्तरातील दुस-या गटापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

बागायत स्तरातील तिस-या गटात अनुक्रमे १९७१-७२ ते १९७६-७७, १९७६-७७ ते १९८५-८६ आणि १९७१-७२ ते १९८५-८६ या कालावधीत अनुक्रमे १.४७, १.५५ आणि २.३० पटीने दर एकरी खर्चात वाढ झाली आहे. मात्र जिरायत स्तरातील याच कालावधीत व याच गटातील दर एकरी खर्च १.५९, १.६३ आणि २.६० पटीने वाढला आहे. म्हणजेच बागायत स्तरातील तिस-या गटाशी जिरायत स्तरातील तिस-या गटाशी तुलना केली असता बागायत गटातील दर एकरी खर्च जिरायत गटातील दर एकरी खर्चापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ६:४

दरडोई शेतक-यांचा खर्च (रुपयामध्ये)

| खर्चाचे स्वरुप वर्ष | बागायत गट क्र.१ २.५ एकर पर्यंत | बागायत गट क्र.२ २.५ ते ५ एकर | बागायत गट क्र.३ ५ एकरापेक्षा जास्त | जिरायत गट क्र.१ २.५ एकरा-पर्यंत | जिरायत गट क्र.२ २.५ ते ५ एकर | जिरायत गट क्र.३ ५ एकरापेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १. अन्नधान्य १९७१-७२ | १५०० | १५५७.५ | १८३६.३६ | ६४० | ९३१.२५ | १६३७.९१ |
| | (३१.६६) | (२०.२७) | (२६.६२) | (३२.९५) | (३४.०१) | (२८.२९) |
| २. शिक्षण | ५७५ | ५६६.६६ | ७७७.२७ | १८० | १३१.२५ | ४२५ |
| | (१२.१३) | (७.३७) | (११.२७) | (९.२६) | (४.७९) | (७.३४) |
| ३. वैद्यकिय | ३७५ | ४२९.१६ | ८४१.८१ | २८० | ३४३.७५ | ११७९.१६ |
| | (७.९१) | (५.५८) | (१२.२०) | (१४.४१) | (१२.५५) | (२०.३७) |
| ४. वहातूक | २७५ | २२५. | २९५.४५ | ९० | १३४.३७ | २२० |
| | (५.८०) | (२.९२) | (४.२८) | (४.६३) | (४.९०) | (३.८०) |
| ५. कपडालत्ता | १००० | १०७५ | २०७७.२७ | ६५० | १०६८.७५ | १५८३.३३ |
| | (२१.१०) | (१३.९९) | (३०.११) | (३३.४७) | (३९.०४) | (२७.३५) |
| ६. अन्य | १०१२.५ | ३८२७.११ | १०६८.६३ | १०२ | १२८.१२ | ७४२.५८ |
| | (२१.३७) | (४९.८३) | (१५.४९) | (५.२५) | (४.६८) | (१२.८२) |
| एकूण .. | ४७३७.५ | ७६८१.२३ | ६८९६.७९ | १९४२ | २७३७.४९ | ५७८७.९८ |
| | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |
| १. अन्नधान्य १९७६-७७ | २४२५ | २३८७.५ | ३२०९.०९ | ९८० | १६३४.३७ | २८०४.१६ |
| | (३२.१९) | (२५.९४) | (२२.६१) | (१३.९६) | (२५.१७) | (२७.८८) |
| २. शिक्षण | ८७५ | १२७०.८३ | १६७२.७२ | २९० | ३०० | ११०.४१ |
| | (११.६१) | (१३.८१) | (११.७८) | (४.१३) | (४.६२) | (१.०५) |
| ३. वैद्यकिय | ६७५ | ८०१.६६ | १३८१.८१ | ४६० | ११३४.३७ | १५४३.७५ |
| | (८.९६) | (८.७१) | (९.७३) | (६.५५) | (१७.४७) | (१५.३४) |
| ४. वाहतूक | ३५० | ४०० | ५५० | १६० | २५३.१२ | २८७.५ |
| | (४.६४) | (४.३४) | (३.८७) | (२.२७) | (३.८९) | (४.८४) |
| ५. कपडालत्ता | १४२५ | १७१२.५ | ३३४५.४५ | ९२० | १७५६.२५ | २३५० |
| | (१८.९२) | (१८.६१) | (२३.५७) | (१३.१०) | (२७.०५) | (२३.३६) |
| ६. अन्य | १७८१.२५ | २६२७.११ | ४०३३.६३ | ४२०९ | १४१४.०६ | १९६१.९५ |
| | (२३.६५) | (२८.५६) | (२८.४२) | (५९.९६) | (२१.७८) | (१९.५०) |
| एकूण .. | ७५३१.२५) | ९२००.०० | १४१९२.७ | ७०१९ | ६४९२.१७ | १००५७.७७ |
| | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |
| १. अन्नधान्य १९८५-८६ | ३३०० | ३२८३.३३ | ४५४५.४५ | १५४० | २७८१.२५ | ४११७.७० |
| | (२२.२५) | (२१.८५) | (१६.३७) | (२४.२४) | (१८.३८) | (२३.९१) |
| २. शिक्षण | ११०० | १८०० | २५२२.७२ | ४०० | ५१५.६२ | १२७९.१६ |
| | (७.४१) | (११.९८) | (९.०९) | (६.२९) | (३.४०) | (७.४२) |
| ३. वैद्यकिय | २८२५ | १५०८.३३ | ३५७२.७२ | १३२० | १३८७.५ | ३२०० |
| | (१९.०५) | (१०.०३) | (१२.८७) | (२०.७८) | (९.१७) | (१८.५८) |
| ४. वहातूक | ८७५ | ७२९.१६ | ९९५.४५ | २६० | ४२०.३१ | ७०२.९१ |
| | (५.९०) | (४.८५) | (३.५८) | (४.०९) | (२.७७) | (४.०८) |
| ५. कपडालत्ता | २१२५ | २९६६.६६ | ४७३६.३६ | १४४० | २२६८.७५ | ३६३७.५ |
| | (१४.३३) | (१९.७४) | (१७.०६) | (२२.६७) | (१४.९९) | (२१.१२) |
| ६. अन्य | ४६०० | ४७३६.६६ | ११३७८.१८ | १३९२ | ७७५४.६८ | ४२८१.३३ |
| | (३१.०२) | (३१.२५) | (४१) | (२१.९१) | (५१.२६) | (२४.८६) |
| एकूण .. | १४८२५ | १५०२४.१४ | २७७५०.८८ | ६३५२ | १५१२८.११ | १७२१८.६ |
| | (१००.०) | (१००.०) | (१००.०) | (१००.०) | (१००.०) | (१००.०) |

तक्ता क्र.६:४ मध्ये दरडोई शेतक-यांच्या विविध बाबीवरील खर्चाचे प्रमाण दर्शाविले आहे. १९७१-७२ मध्ये बागायत स्तरातील पहिल्या गटात शेतक-यांचे अन्नधान्यावरील एकूण खर्चाचे प्रमाण जास्तीत जास्त आहे. (३१.६६ टक्के) त्याखालोखाल अन्य खर्चाचे प्रमाण आहे. (२१.३७ टक्के) (अन्य खर्चामध्ये खंड, जळण, वर्तमानपत्र, मासिके, सौंदर्यप्रसादणे, करमणूक, घराची दुरुस्ती, देणग्या, अनपेक्षित खर्च, कर, शेतसारा, घरपट्टी, पाणीपट्टी, कोर्टकचे-या इ.चा समावेश होतो) तर कपडयावरील खर्च सुध्दा २१.१० टक्के इतर आहे. मात्र वहातून व वैद्यकिय खर्च अनुक्रमे ५.८ टक्के व ७.९१ टक्के इतकाच आढळतो. जिरायत स्तरातील पहिल्या गटातील शेतक-यांच्या बाबतीत अन्नधान्यावरील खर्चाचे प्रमाण ३२.९५ टक्के इतके आहे. तर त्यापेक्षा अधिक खर्च कपड्यालत्यावर आहे. (३३.४७ टक्के) येथे अन्य खर्चाचे प्रमाण मात्र खूपच कमी असल्याचे दिसून येते. (५.२५ टक्के). तर वैद्यकिय व वहातूकीवरील खर्च अनुक्रमे १४.४५ टक्के व ४.६३ टक्के आहे.

१९७१-७२ मध्ये बागायत स्तरातील दुस-या गटाचा अन्य खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४९.८३ टक्के इतके आहे. तर त्याखालोखाल अन्नधान्यावर २०.२७ टक्के खर्च होत होता. तर कपड्यालत्यावर १३.९९ टक्के खर्च होत होता. तर सर्वात कमी २.९२ टक्के वहातूकीवर खर्च होत होता. जिरायत स्तरातील दुस-या गटाच्या बाबतीत कपड्यावर सर्वाधिक म्हणजे ३९.०४ टक्के तर त्या खालोखाल अन्नधान्यावर ३४.०१ टक्के खर्च होता. दुस-या गटातसुध्दा अन्य खर्चाचे प्रयत्न खुपच कमी दिसून येते. (४.६८ टक्के). तर वैद्यकिय व वहातुकीवरील खर्च अनुक्रमे १२.५५ टक्के व ४.९० टक्के होते व शिक्षणावर या गटातील शेतक-यांचा खर्च ४.७९ टक्के होता. बागायत गटाशी तुलना करता जिरायत गटातील शेतक-यांचा अन्नधान्य व कपड्यावरील खर्च अधिक असल्याचे दिसून येते.

१९७१-७२ मध्ये बागायत स्तरातील तिस-या गटामध्ये कपड्यावर सर्वाधिक म्हणजे ३०.११ टक्के खर्च होत होता. त्याखालोखाल अन्नधान्यावरील खर्च

२६.६२ टक्के होता. तर शिक्षण आणि वैद्यकीय खर्च अनुक्रमे ११.२७ टक्के व १२.२० टक्के होता. आणि अन्य खर्चाचे प्रमाण १५.४९ टक्के इतके होते. जिरायत स्तरातील तिस-या गटामध्ये १९७१-७२ साली अन्नधान्यावर २८.२९ टक्के खर्च होता. तर कपड्यांवर २७.३५ टक्के खर्च होता. त्याचप्रमाणे वैद्यकिय खर्च २०.३७ टक्के इतका होता आणि अन्य खर्चाचे प्रमाण १२.८२ टक्के इतके होते.

बागायत व जिरायत या दोन्ही स्तरांची तुलना करता १९७१-७२ मध्ये अन्नधान्यावरील खर्च जवळपास समान असल्याचे दिसून येते. तर शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण जिरायतपेक्षा बागायत शेतक-यांच्यामध्ये अधिक दिसून येते आणि वैद्यकिय खर्चाचे प्रमाण बागायत शेतक-यांपेक्षा जिरायत शेतक-यांमध्ये अधिक आढळते. कपड्यावरील खर्चाचे प्रमाण सुध्दा जिरायत शेतक-यांचे अधिक दिसून येते. अन्य खर्चाचे प्रमाण मात्र बागायतदार शेतक-यांच्या गटामध्ये अधिक असल्याचे दिसून येते. तसेच एकूण खर्चाचा विचार करता सुध्दा एकूण खर्चाचे प्रमाण बागायतदार गटामध्येच अधिक आहे.

१९७६-७७ मध्ये बागायतदार स्तरातील पहिल्या गटामध्ये अन्नधान्यावर ३२.१९ टक्के खर्च होता. त्या खालोखाल अन्य खर्च २३.६५ टक्के इतका होता. तर शिक्षण व वैद्यकिय खर्च अनुक्रमे ११.६१ टक्के व ८.९६ टक्के इतका होता. आणि कपड्यावर १८.९२ टक्के खर्च होता. जिरायत स्तरातील पहिल्या गटामध्ये यावर्षी अन्य खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५९.९६ टक्के इतका होता. तर अन्नधान्य व कपड्यांवर अनुक्रमे १३.९६ व १३.१० टक्के इतका होता. तर शिक्षणावर फक्त ४.१३ टक्के खर्च होत होता.

१९७६-७७ मध्ये बागायत स्तरातील दुस-या गटामध्ये अन्य खर्च २८.५६ टक्के होता. तर अन्नधान्यावर २५.९४ टक्के इतका होता. शिक्षण आणि वैद्यकिय खर्चाचे प्रमाण अनुक्रमे १३.८१ टक्के आणि ८.७१ टक्के इतके होते. तर

कपड्यांवर १८.६१ टक्के इतका खर्च होता. जिरायत स्तरातील दुसऱ्या गटाचे कपड्यालत्यावरील खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २७.०५ टक्के इतके होते. तर अन्नधान्यावर २५.१७ टक्के खर्च केला जात होता. तर वैद्यकिय व वहातुकीवर अनुक्रमे १७.४७ टक्के व ३.८९ टक्के इतका होता. तर अन्य खर्चाचे प्रमाण २१.७८ टक्के इतके होते.

१९७६-७७ या वर्षी बागायतदार स्तरातील तिसऱ्या गटामध्ये अन्नधान्यावर २२.६१ टक्के खर्च होता. तर अन्य खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २८.४२ टक्के होते. तर कपड्यांवरील खर्चाचे प्रमाण २३.५७ टक्के होते. आणि शिक्षण व वैद्यकिय खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ११.७८ टक्के व ९.७३ टक्के इतके होते. वहातूकीवरील खर्च मात्र सर्वात कमी म्हणजे ३.८७ टक्के इतका होता. जिरायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये अन्नधान्यावर सर्वाधिक म्हणजे २७.८८ टक्के खर्च होता. त्याखालोखाल कपड्यालत्यावरील खर्चाचे प्रमाण २३.३६ टक्के होते. तर अन्य खर्चाचे प्रमाण १९.५० टक्के होते. शिक्षण आणि वैद्यकिय खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ९.०५ टक्के व १५.३४ टक्के इतके होते. तर वहातूकीवरील खर्च सर्वात कमी म्हणजे ४.८४ टक्के इतका होता.

बागायत व जिरायत स्तराशी तुलना करता १९७६-७७ मध्ये शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण बागायत स्तरातील शेतकऱ्यांमध्ये अधिक आढळते. तर वैद्यकिय खर्चाचे प्रमाण जिरायत स्तरातील शेतकऱ्यात अधिक आढळते.

१९८५-८६ मध्ये बागायत स्तरातील पहिल्या गटामध्ये अन्य खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३१.०२ टक्के इतके होते. तर अन्नधान्यावरील खर्चाचे प्रमाण २२.२५ टक्के इतके होते. आणि कपड्यांवर १४.३३ टक्के खर्च होता. तर शिक्षण व वैद्यकिय खर्च अनुक्रमे ७.४१ टक्के व १९.०५ टक्के इतका होता. जिरायत स्तरामधील पहिल्या गटामध्ये यावर्षी अन्नधान्यावर २४.२४ टक्के खर्च होत होता. तर कपड्यांवर २२.६७ टक्के खर्च होत होता. तर वहातूक खर्च ४.०९ टक्के इतका

व शिक्षण आणि वैद्यकिय खर्चाचे प्रमाण ६.२९ टक्के व २०.७८ टक्के इतके होते.

१९८५-८६ मध्ये बागायत स्तरातील दुसऱ्या गटामध्ये अन्नधान्यावरील खर्चाचे प्रमाण २१.७५ टक्के इतके होते. तर अन्य खर्चावरील प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३१.२५ टक्के इतके होते आणि कपड्यांवरील खर्चाचे प्रमाण १९.७४ टक्के होते. तर शिक्षण आणि वैद्यकिय खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ११.९८ टक्के व १०.०३ टक्के होते. जिरायत स्तरातील दुसऱ्या गटामध्ये अन्य खर्चाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५१.२६ टक्के म्हणजे निम्म्याहून अधिक खर्च हा अन्य खर्च होता. हा खर्च वाढल्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकांनी यावर्षी नविन घरे बांधणे किंवा घराची दुरूस्ती करणे यावर बराच खर्च केलेच निदर्शनास येते. या गटाचा अन्नधान्यावरील खर्च १८.३८ टक्के इतका होता. तर कपड्यांवरील खर्च १४.९९ टक्के होता आणि वहातुकीवरील खर्च सर्वात कमी म्हणजे २.७७ टक्के होता.

१९८५-८६ मध्ये बागायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये सर्वाधिक अन्य खर्च होता. (४१ टक्के). तर कपड्यांवर १७.०६ टक्के खर्च होता. आणि १६.३७ टक्के खर्च अन्नधान्यावर होता. वैद्यकिय खर्चाचे प्रमाण १२.८७ टक्के आणि शिक्षणावरील खर्च ९.०९ टक्के इतका होता. तर वहातूकीवर ३.५८ टक्के खर्च होता. जिरायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये अन्नधान्यावर २३.९१ टक्के खर्च होता. तर अन्य खर्चाचे प्रमाण २४.८६ टक्के इतके होते. कपड्यावरील खर्चाचे प्रमाण २१.१२ टक्के होते आणि शिक्षण व वैद्यकिय खर्चाचे प्रमाण अनुक्रमे ७.४२ टक्के व १८.५८ टक्के इतके होते व वहातुकीवर ४.०८ टक्के खर्च होता.

तक्ता क्र. ६:५

दरडोई प्राप्ती आणि खर्च (रुपयामध्ये)

| वर्ष | जिरा बागायत | | | | | | | | | जिरायत | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गट क्र.१ २.५ एकरापर्यंत | | | गट क्र. २ २.५ ते ५ एकर | | | गट क्र.३ ५ एकरापेक्षा जास्त | | | गट,क्र १ २.५ एकरापर्यंत | | | गट क्र.२ २.५ ते ५ एकर | | | गट क्र. ३ ५ एकरापेक्षा जास्त | | |
| | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट | एकूण प्राप्ती | एकूण खर्च | वाढावा तूट |
| १९७१-७२ | ४३३६ (४) | ४७३७.५ | -४०१.५ | ६६१८ (१२) | ७६८१.२३ | -१०६३.० | १२५२८ (११) | ६८९६.७९ | ५६३१.२१ | २८९२ (५) | १९४२ | ९५० | ३६११ (१६) | २७३७.४९ | ८७३.५१ | ६३८०. (२४) | ५७८७.९८ | ५९२.०२ |
| १९७६-७७ | ८१९६ (४) | ७५३१.२५ | ६६४.७५ | ११५३५ (१२) | ९२००.४ | २३३४.६ | २१६०३ (११) | १४१९२.७ | ७४१०.३ | ५०५९ (५) | ७०१९ | -१९६० | ७८२८ (१६) | ६४९२.१७ | १३३५.८३ | ११७४७ (२४) | १००५७.७७ | १६८९.२३ |
| १९८५-८६ | ११४५३ (४) | १४८२५ | -३३७२ | १६६३८ (१२) | १५०२४.१४ | १६१३.८६ | ३०११४ (११) | २७७५०.८८ | २३६३.१२ | ६३२८ (५) | ६३५२ | - २४ | १०२८१ (१६) | १५१२८.११ | -४८४७.११ | १८५७५ (२४) | १७२१८.६ | १३५६.४ |

टीप - कंसातील आकडे संबंधित गटातील उत्तरदात्यांची संख्या दर्शवितात.

तक्ता क्र.६:५ मध्ये उत्तरदात्याच्या दरडोई प्राप्ती व खर्च याचे विवेचन केले आहे. बागायत स्तरातील पहिल्या गटामध्ये १९७१-७२ साली एकूण ४ उत्तरदात्यांची एकूण प्राप्ती पेक्षा एकूण खर्चाचे प्रमाण जास्त आढळते. (४०१.५ रु.) म्हणजेच सरासरी दरडोई १०० रु.चे उत्तरदाते स्थानिक सावकार अगर नातलगाचे कर्जबाजारी आहेत. – १९७६-७७ साली एकूण प्राप्ती एकूण खर्चापेक्षा ६६४.७५ रु.ने अधिक्य आढळते. (सरासरी दरडोई आधिक्य १६६ रु.) १९८५-८६ साली एकूण प्राप्तीपेक्षा एकूण खर्च ३३७२ रु.नी. अधिक आहे. (सरासरी दरडोई कर्ज ८४२ रु.) जिरायत स्तरातील पहिल्या गटाच्या बाबतीत १९७१-७२ साली एकूण प्राप्तीपेक्षा एकूण खर्चाचे प्रमाण कमी आढळते. (९५० रु चा वाढावा) मात्र १९७६-७७ व १९८५-८६ साली एकूण खर्चाचे प्रमाण एकूण प्राप्तीपेक्षा अनुक्रमे १९६० रु. व २४ रु. अधिक आढळते. म्हणजेच अलिकडील काळात या गटाचे प्राप्तीपेक्षा खर्चाचे प्रमाण अधिक आढळते. तुलनात्मकदृष्टया १९७१-७२ साली बागायत स्तरातील पहिला गट जिरायत स्तरातील. पहिल्या गटापेक्षा आर्थिक दृष्टया दुर्बल आढळतो. तथापि १९७६-७७ साली जिरायत स्तरातील पहिल्या गटापेक्षा बागायत स्तरातील पहिला गट अधिक सबळ आढळतो. तर १९८५-८६ साली जिरायत व बागायत हे दोन्ही गट आर्थिकदृष्टया दुर्बल आढळतात.

बागायत स्तरातील दुसऱ्या गटामध्ये १९७१-७२ एकूण १२ उत्तरदात्यांची एकूण प्राप्तीपेक्षा एकूण खर्चाचे प्रमाणे जास्त आढळते. (१०६३/- रु.) म्हणजेच सरासरी दरडोई ८८.५८ रुपके कर्ज प्रत्येक उत्तरदात्यावर आहे). १९७६-७७ साली एकूण प्राप्ती एकूण खर्चापेक्षा २३३४.६ रु.नी अधिक आहे. (सरासरी दरडोई अधिक्य १९४.५५ रू.) तसेच १९८५-८६ मध्ये सुध्दा प्राप्ती ही खर्चापेक्षा अधिक आहे. (१६१३.८६ रु.) सरासरी दरडोई अधिक्य १३४.४८ रु.इतके आढळते. जिरायत स्तरातील दुसऱ्या गटाच्या बाबतीत १९७१ मध्ये एकूण १६ उत्तरदात्याची एकूण प्राप्ती एकूण खर्चापेक्षा ८७३.५१ रु.नी अधिक आढळते. म्हणजेच या वर्षी

सरासरी दरडोई ५४.५९ रु. अधिक्य आढळते. १९७६-७७ साली सुध्दा या गटाची एकूण प्राप्ती एकूण खर्चापेक्षा १३३५.८३ रु.नी अधिक आढळते. मात्र १९८५-८६ साली एकूण प्राप्ती एकूण खर्चापेक्षा ४८४७.११ रु.नी कमी आढळते. म्हणजेच यावर्षी सरासरी दरडोई ३०२.९४ रु. स्थानिक सावकाराचे किंवा नातलगाचे उत्तरदाते कर्जबाजारी आहेत.

बागायत व जिरायत या दोन्ही दुसऱ्या गटाची १९७१-७२ मध्ये तुलना केली असता बागायत स्तरातील उत्तरदाते जिरायत गटातील उत्तरदात्यापेक्षा दुर्बल आढळतात. १९७६-७७ ला दोन्ही गटातील उत्तरदाते आर्थिक दृष्टया सबळ आढळतात. तर १९८५-८६ ला बागायत गटापेक्षा जिरायत गट आर्थिकदृष्टया दुर्बल आढळतात.

बागायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये १९७१-७२, १९७६-७७ आणि १९८५-८६ मध्ये एकूण ११ उत्तरदात्याची प्राप्ती ही खर्चापेक्षा अनुक्रमे ५६४१.९१, ७४१०.३ आणि २३६३.१२ रु.नी अधिक आहे. म्हणजेच तिसऱ्या गटातील बागायत स्तरातील उत्तरदाते हे आर्थिकदृष्टया चांगल्या स्थितीत आहेत. जिरायत स्तरातील तिसऱ्या गटामध्ये सुध्दा १९७१, १९७६ व १९८५ साली उत्तरदात्याची प्राप्ती ही खर्चापेक्षा अनुक्रमे ५९२.०२, १६८९.२३ आणि १३५६.४ रु.नी अधिक आढळते. मात्र बागायत स्तरातील व जिरायत स्तरातील उत्तरदात्याची तुलना केली असता बागायत स्तरातील उत्तरदात्याची प्राप्ती ही जिरायत स्तरातील प्राप्तीपेक्षा अधिक दिसून येते.

.......

## प्रकरण ७ वे:- गोषवारा आणि उपाययोजना

### ७:१ - कृषि अर्थशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती

७:१:१- विकसनशील अर्थव्यवस्थेत कृषि व्यवसायास महत्त्व लाभते. या व्यवसायातील कृषि उत्पादनाशी निगडीत असणा-या विविध पैलूंचा अभ्यास केला जातो. उदा. विक्रीचे, उपभोगाचे, वाटपाचे, अर्थशास्त्र इ.

७:१:२- कृषि विषयक मागासलेपणा कमी करण्यासाठी परिस्थीतीच्या अनुषंगाने वेगवेगळी धोरणे आखली जातात. त्यासाठी कृषि व्यवसायाचे अध्ययन दोन पध्दतीने केले जाते- सूक्ष्मलक्षी आणि समग्रलक्षी पध्दति.

७:१:३- देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषि व्यवसायाकडून मोलाची भूमिका पार पाडली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचे एक प्रमुख साधन, उपजीविकेचे साधन इ. तसेच या व्यवसायातील नियोजनामार्फत नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग केला जात आहे. रोजगार संधीची उपलब्धता, आर्थिक विकासास योग्य दिशा आणि आंतरराष्ट्रीय विकासास चालना मिळत आहे.

७:१:४- स्वातंत्र्यपूर्व काळात शेतीमधील वाढ प्रामुख्याने अन्नधान्याच्या पिकातील वाढ १ टक्याने झाली पण याच काळात लोकसंख्या ३८% ने वाढला.

७:१:५- स्वातंत्र्योत्तर काळात मशागतीखालील क्षेत्रात वाढ झाली, दर हेक्टरी उत्पादकता वाढली. विशेषता: हरितक्रांती उपक्रमामुळे पिकांच्या वाढीचा वार्षिक दर वाढला.

७:१:६- भारतात काही नीवडक पिकांच्या बाबतीत, अन्य राष्ट्रांशी तुलना केली तर [चीन, अमेरिका, जपान] दर हेक्टरी उत्पादकता घटत आहे असे आढळते.

७:१:७- नविन तंत्रज्ञानाचा लाभ ठराविक राज्यांना मिळालेला आहे. नव्हे तंत्रज्ञानाचा महत्तम वापर करून काही राज्यांनी आर्थिक प्रगती घडवून आणली आहे.

### ७:२ - अध्ययनाची रूपरेखा

७:२:१- भारतीय अर्थव्यवस्थेला कृषि व्यवसायाचे महत्त्व विचारात घेऊन

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्याची नमुना वजा निवड केली आहे.

७:२:२- ग्रामीण व्यवसायातील कृषि व्यवसायातील पिकांचा आकृतीबंध पिकांचा फेरपालट आणि उत्पन्न व खर्च या मधील बदलाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

७:२:३- राधानगरी तालुक्यांतील ११३ खेड्यापैकी यादृच्छिक पध्दतीने १२ खेड्यांची नमुना वजा निवड केली आहे. खेड्याची निवड करताना खेड्याची लोकसंख्या, एकूण भूधारण क्षेत्र, जलसिंचन सुविधा इ. निकष आधार भुत मानले.

७:२:४- प्रत्येक खेड्यातील प्रत्येक गटातील तीन आणि जिरायत गटातील तीन असे एकूण सहा शेतक-याची अनुक्रमे २.५ एकरापेंक्षा कमी, २.५ ते ५ एकर आणि ५ एकरापेंक्षा जादा जमीन धारण केलेल्या शेतक-याची निवड केली. एकूण ७२ शेतक-याची नमुना वजा निवड केली.

७:२:५- तथ्ये संकलनासाठी प्राथमीक सामुग्री आणि दुय्यम सामुग्री या दोन्ही तंत्राचा अवलंब करणेत आला.

७:२:६- उत्तरदात्याचे बाबतीत ८७.५% उत्तरदाते हिंदू धर्मिय आहेत. ७२.७% उत्तरदाते ४ ते ६ व्यक्ती असणा-या कुटुंबातील आहेत. स्त्रीयाचे प्रमाण ४४.५% आहे. २६ ते ५५ वर्ष वयोगटातील ७३.७% उत्तरदाते आहेत ७२.२२% उत्तरदाते पहीली ते दहीवी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. १९ ते६० वर्षे वय गटातील कर्त्या वर्गाचे टक्केवारी ६१.०७ इतकी आहे असे आढळते.

## ७:३ – राधानगरी तालुक्याचे स्वरुप

७:३:१- राधानगरी तालुक्यातील भौगोलीक परिस्थीती विचारात घेता अंदाजे ७२.४३% क्षेत्र टेकड्या घाट व पर्वत यांनी व्यपले आहे. हा तालुका ग्रामीण तालुका म्हणून संबोधीला जातो. बहुसंख्य लोकांचे वास्तव्य भोगावती, तुळशी व दुधगंगा नदीच्याच कुशीत आढळते. तसेच या तालुक्याचें वरदान म्हणजे शाहू महाराजांनी १९०७ साली केलेली लक्ष्मी तलावाची योजना होय.

७:३:२- दुय्यम सामुग्रीच्या अंतर्गत एकूण लोकसंख्येपैकी स्त्री-पुरुषांची [illegible]

टक्केवारी पन्नास टक्याच्या आसपास आहे. वर्गीकृत जाती-जमाती यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे १० टक्के व १ टक्यापेक्षा कमी आहे. साक्षरतेचे प्रमाण १९७१ व १९८१ साली अनुक्रमे २९-१८ व ३४- ३४.८६% इतके आढळते. घरकुलाच्या बाबतीत अनुक्रमे सरासरी ६ व्यक्तीच्या पाठीमा एक घरकुल आढळते. लोकसंख्येच्या व्यावसायीक रचनेत अनुक्रमे १९७१ व १९८१ साली पुरुष, स्त्रीयांचे प्रमाण ६४.५०, ५९.९७ आणि ३५.४६, ४०.०२ इतके टक्के आढळते.

७:३:३- राधानगरी तालुक्याच्या अन्य सुविधामध्ये शाळांची संख्या वाढत आहे. वैद्यकीय सुविधा वाढत आहेत. पिण्याच्या पाण्याबाबतीत नदीच्या पाण्याचा वापर ज्यादा आढळतो. विद्युत पुरवठ्याच्या बाबतीत प्रगती आढळते. पण पोस्ट ऑफिस व टेलीग्रामची सुविधा अत्यल्प आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भौगोलीक परिस्थीती व राहणीमाणाचा दर्जा होय.

७:३:४- या तालुक्यात घर रचनेमध्ये आधुनिकीकरण आढळते. प्रमुख आहारात नाचणी, ज्वारी, मक्याची भाकरी, कडधान्य, भाजीपाला आढळतो. पेहराव दागदागीने, धार्मिक प्रथा, सांस्कृतिक स्थिती याबाबत कोल्हापूर जिल्ह्याच्या संस्कृतीचे दर्शन आढळते.

## ७:४ - राधानगरी तालुक्यातील पिकांचा आकृतीबंध

७:४:१- पिकांचा आकृतिबंध भौगोलिक, नैसर्गिक व आर्थिक परिस्थीतीशी मिळता जुळता असल्याने मिश्रीत, बहुविध आणि दुहेरी पिक पध्दत आढळते.

७:४:२- पिक पध्दतीवर परिणाम करणारे प्रमुख घटक म्हणजे हवामाण, पाऊस, जमीनीचा प्रकार, तांत्रिक घटक, पिकांची किंमत व उत्पन्न, जमीनीचा आकार, पिकांचा कालावधी, उत्पन्नाची खात्री, साधनांची उपलब्धता, शासकिय धोरण, सुधारण पध्दती. इ.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

७:४:३- दुय्यम सामुग्रीच्या आधारे एकूण मशागतीखालील क्षेत्रामध्ये वर्ग एक मधील पिकाच्या प्रकारामध्ये चढउतार आढळतो. वर्ग दोन मधील पिकाच्या प्रकारामध्ये घट आढळते. वर्ग ५ बाबत चढउतार आढळतो. वर्ग क्र. ६ बाबत ऊसाच्या व भुईमुगाच्या बाबतीत वाढ आढळते. मात्र काही पिकाबाबतीत घट आढळते.

७:४:४- प्राथमीक सामुग्रीच्या आधारे खादय धान्याबाबतीत एकूण मशागतीखालील क्षेत्रामध्ये चढउतार आढळतो. कडधान्याच्या बाबतीत वाढ आढळते. तसेच पैसा पिकाच्या बाबतीत सुध्दा एकूण मशागतीखालील क्षेत्रफळात वाढ आढळते.

७:४:५- प्राथमीक सामुग्रीच्या आधारे विहिरीखालील जलसिंचीत क्षेत्रफात वाढ होत आहे. जलसिंचीत योजनेव्दारे क्षेत्रफळात वाढ होत आहे म्हणजेच एकूण जलसिंचीत क्षेत्रफळात वाढ आढळते.

७:४:६- प्राथमीक सामुग्रीच्या आधारे जिरायत क्षेत्रफळाबाबत वापरण्यास लायक पण पडिक क्षेत्रफळात घट आढळते. कायमची पड क्षेत्रफळात वाढ आढळते. एकूण पिकावू क्षेत्रात वाढ आढळते. भागाने घेतलेल्या क्षेत्रफळात चढउतार आढळतो.

७:४:७- कसण्यास पात्र असलेल्या पडिक जमीनीच्या प्रमुख कारणामधे कुरण म्हणून जमीनीचा वापर, पाण्याची टंचाई या कारणाची अनुभूती आढळते.

७:४:८- दुस-याची जमीन कसण्यास घेतलेल्या प्रमुख कारणामध्ये जमीन धारकांची गैरसोय, जमीनदाराची प्रवृत्ती या कारणाची अनुभूती आढळते.

७:४:९- पिक पध्दतीचे ज्ञान मिळण्याच्या माध्यमामध्ये वडिल/कुटुंब प्रमुख परंपरागत कृषि पध्दती, तालुका पातळीवरिल कृषि अधिकारी. प्रमुख माध्यमाची अनुमती आढळते.

७:४:१०- पिक पध्दतीमुळे घडून येण्या-या प्रमुख महत्वाच्या बदलांतर्गत प्रमुख बदल अत्याधुनिक खते, बी-बीयाने, रासायनिक औषधे, उत्पादनातील वाढ, जलसिंचन सुविधांचा पर्याप्त वापर आढळतो.

७:४:११- पिक पध्दतीत बदल घडून येण्याच्या कारणामध्ये प्रामुख्याने जलसिंचन सुविधांचे सान्निध्य, पिकांच्या नविन प्रकारामध्ये रोग प्रतिबंधक शक्ती

जमिनीचा कस टिकवून ठेवने, पिक उत्पादनात वृध्दी इ. प्रभावी कारणे आढळतात.

७:४:१२- पिक पध्दतीत बदल झाल्यामुळे कौटुंबीक उत्पन्न वाढले, हा प्रासंगिक फायदा प्रभावी ठरतो.

७:४:१३- पिक पध्दतीत बदल घडून आल्याने प्रामुख्याने कृषि क्षेत्रा अनुषंगीक जलसिंचन सुविधात वाढ आढळते. अत्याधुनिक खते बी-बीयाणे यांच्या वापरात वाढ आढळते.

७:४:१४- पिक पध्दतीच्या स्वरूपावरून मिश्रीत पिक पध्दतीत प्रमुख्याने ऊस क्षेत्रात मक्का, ज्वारी क्षेत्रफळात तूर आढळते. याच बहुविध पिक पध्दतीत ऊस मका, कांदा, कोथंबीर-मिरची, वांगी, ज्वारी, कडधान्य भुईमुग इ. ये अधिक्य आढळते.

७:४:१५- पिक पध्दतीतील बदलामुळे जिरायती क्षेत्रफळात घट होत आहे. शेतीचे यांत्रिकीकरण आढळते. शेतीच्या उत्पादनात वाढ आढळते. विविधांगी सेवा सुविधामध्ये वाढ झाल्याने राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. तसेच वृक्ष व फळबागामध्ये वाढ आढळते. इ. परिणामी निसर्गाचा समतोल टिकवण्य साठी अनुषंगीक परिस्थीती निर्माण होत आहे असे आढळते.

७:५ - राधानगरी तालुक्यातील पिकांचा फेरपालट

७:५:१- जमीनीच्या प्रतवारीनुसार पाण्याच्या उपलब्धतेनुसार आणि व्यक्तिगत भूधारण क्षेत्रफळानुसार पिकांचा फेरपालट आढळतो.

पिकांच्या फेरपालटाचे स्वरूप

| अ.न. | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
|---|---|---|---|
| १. | ऊस | खोडवा | भात |
| २. | भुईमुग | ज्वारी | नाचणी |
| ३. | भात | ऊस | खोडवा |
| ४. | नाचणी | भुईमुग | |
| ५. | ज्वारी | भुईमुग | |
| ६. | नाचणी | वरी | |

७:५:२- पिकांच्या फेरपालटाचे हेतू व परिणामाबाबत जमीनीचा कस टिक-

७:५:२- पिकांच्या फेरपालटाचे हेतू व परिणामांबाबत जमीनीच्या कस टिक-विणे, कृषि उत्पादनात वाढ घडवून आणणे आणि जनावरांसाठी वैरण या घटकांना महत्त्व लाभते.

७:५:३- एकूण पिकांच्या फेरपालटाबाबत बागायत जमीनीच्या क्षेत्रफळामध्ये खरीप हंगामामध्ये चढउतार आणि रब्बी हंगामात क्षेत्रफळात वाढ आढळते. याउलट जिरायत जमीनीच्या क्षेत्रफळामध्ये खरीप हंगामात वाढ आढळते. मात्र रब्बी हंगामात घट आढळते.

७:५:४- पिक फेरपटलास जबाबदार ठरणा-या घटकांमध्ये पर्जन्यवृष्टी, पाणी पुरवठा सुविधा, पिकांच्या हंगामाचा कालावधी इ. प्रमुख घटकांना महत्त्व लाभते.

७:५:५- खरीप हंगामातील पिकांच्या फेरपाटलामध्ये बागायत गटातील ऊस-खोडवा-भात, ज्वार+भुईमुग, आणि जिरायत गटाबाबत भुईमुग-हायब्रीड ज्वारी, ज्वारी -नाचणी-हंगामी भात अशी अवस्था आढळते.

७:५:६- रब्बी हंगामातील पिकांच्या फेरपटलामुळे बागायत गटाबाबत भात गहू-कलिंगडे-गाजरे-कांदे-लसून, ~~उन्हाळी~~-गहू-वांगी-मिरची कोबी आणि जिरायत गटाबाबत हरभरा-उन्हाळी गहू-ज्वारी-हरभरा-वाटाणा अशी अवस्था आढळते.

७:५:७- अध्ययन कालावधीत पिकांचे फेरपालट परिणामाबाबत प्रामुख्याने कृषि उत्पादनात वाढ घडून आली. डेअरी व्यवसायास वाढ घडून आली.

७:५:८- अध्ययन कालावधीत वृक्ष फळबागाबाबतीत निलगीरी, आंबा, काजू, साग नारळ, यामध्ये प्रामुख्याने वाढ आढळते.

७:५:९- वृक्ष फळबागा वाढवण्याच्या हेतूमध्ये प्रमुख्याने घरगुती उपभोग, पूरक उत्त उत्पन्न ~~म~~ मिळवणे या हेतूंना प्राधान्य लाभलेले आढळते.

७:६- प्राप्ती व खर्च

७:६:१- बागायत गटातील उत्तरदात्याच्या बाबतीत-

[१९५१-५२ ते १९८५-८६ या काळांत]

अ] पहील्या गटातील [२.५ एकर पेक्षाकमी] उत्तरदात्यांच्या बाबतीत उत्पादनांत वाढ आढळते. परिणामी शेती उत्पादन खर्चात वाढ आढळते. ए.पु

पशुधनाबाबत मिळणा-या प्राप्तीत चढउतार आढळतो. बिगर शेती. व्यवसाया पासून मिळणा-या उत्पन्नात एकूण कौटुंबीक निव्वळ उत्पन्नात वाढ आढळते तसेंच वर्षातील उसनवारी / कर्जाबाबत वाढ आढळते.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकर] उत्तरदात्याच्या बाबतीत शेती उत्पादनात वाढ आढळते. परिणामी शेती उत्पादन खर्चात वाढ आढळते. बिगरशेत व्यवसायापासून मिळणा-या उत्पन्नात एकून कौटुंबीक निव्वळ उत्पन्नात वाढ आढळते. तसेंच वर्षातील उसनवारी /कर्जाबाबत वाढ आढळते.

क] तिस-या गटातील [५ एकर पेंक्षा अधिक] उत्तरदात्याबाबत शेती उत्पादनात , शेती उत्पादन खर्च बिगर शेती व्यवसायात एकुण कौटुंबीक निव्वळ उत्पन्नात वाढ आढळते. तसेंच वर्षातील उसनवारी /कर्जाबाबतही वाढ आढळते.

जिरायत गटातील उत्तरदात्याचे बाबतीत [१९५१ ते १९८५-८६ या कालावधीत]

अ] पहिल्या गटातील [२.५ एकरापेंक्षा कमी] उत्तरदात्याचे बाबतीत एकून शेती उत्पादनाशी स्थूल प्राप्तीत वाढ होत आहे. परिणामी शेती उत्पादनाचा खर्च वाढत आहे. पशुधनापासून मिळणा-या प्राप्तीत चढउतार आढळतो. बिगर शेती व्यवसायापासून मिळणा-या प्राप्तीत वाढ होत आहे. मात्र फक्त १९८५-८६ साली वर्षातील उसनवारी /कर्ज आढळतात.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकर] उत्तरदात्याच्या बाबतीत आणि तिस-या गटातील [५एकर पेंक्षा अधिक] उत्तरदात्याचे बाबतीत शेती उत्पादनाची स्थूल प्राप्ती, शेती उत्पादनाचा एकून खर्च, शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न, पशुधनापासून मिळणारे निव्वळ उत्पन्न, बिगर शेतीपासून मिळणारी प्राप्ती, कुटुंबाचे निव्वळ एकून उत्पन्न, वर्षातील उसनवारी/कर्ज इ. सातत्याने वाढ आढळते.

७:६:२- बागायत आणि जिरायत गटातील प्रत्येकि तिन्ही गटातील उत्तरदात्याबाबत दर एकरी प्राप्तीत वाढ आढळते. तसेंच दर एकरी शेतीवरील खर्चात वाढ आढळते.

७:६:३- बागायत गटातील उत्तरदात्याचे बाबतीत १९५१-५२ ते १९८५-८६ या कालावधीत दरडोई शेतक-याच्या शेकडा खर्चाबाबत -

अ] पहिल्या गटातील [२.५ एकरापेक्षा कमी] उत्तरदात्याचेबाबतीत अन्नधान्यावरील खर्च १९८५-८६ मध्ये घटला आहे. शिक्षणावरील खर्चात घट आढळते, वैद्यकिय खर्चात वाढ आढळते. वाहतूक खर्चात वाढ आढळते. कपड्यावरील खर्चात घट आढळते व अन्य खर्चावरील शे. प्रमाणांत वाढ आढळते.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकरपर्यंत] उत्तरदात्याबाबत अन्नधान्य आणि शिक्षणावरील खर्चात चढउतार आढळतात. वैद्यकिय, वहातूक, व कपडालत्त्यावरील खर्चात वाढ आढळते. मात्र अन्य खर्चाबाबत चढउतार आढळतो.

क] तिस-या गटातील [५ एकरपेक्षा जास्त] उत्तरदात्याबाबतीत अन्नधान्यावरिल खर्चात घट आढळते, शिक्षणावरील खर्चात घट आढळते, वैद्यकिय खर्चात चढउतार आढळतो, कपड्यावरील खर्चात घट आढळते. मात्र अन्य खर्चावरील शे. प प्रमाण घटत आहे.

७:६:४- जिरायत गटातील उत्तरदात्याबाबतीत अध्ययन कालावधीत दरडोई शेतक-याच्या शेकडा खर्चाबाबत -

अ] पहिल्या गटातील [२.५ एकरापेंक्षा कमी] उत्तरदात्याबाबत अन्नधान्य, शिक्षण, वैद्यकिय, वहातूक, कपडालत्ता खर्चात चढउतार आढळतात. मात्र १९७६-७७ साली अन्य खर्च ६७% आढळतो.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकर] उत्तरदात्याबाबतीत वहातूक, शिक्षण व कपडालत्त्यावरिल आणि अन्नधान्य खर्चात घट आढळते. वैद्यकिय खर्चात चढउतार आढळतो. मात्र अन्य खर्चावरिल शे. प्रमाणामध्ये वाढ आढळते.

क] तिस-या गटातील [५ एकरपेंक्षा जास्त] उत्तरदात्याबाबत अन्नधान्यावरिल खर्चात घट आढळते. शिक्षण, वैद्यकिय व वहातूक खर्चात चढउतार आढळतात. कपडयालत्यावरिल खर्चात घट आढळते. मात्र अन्य खर्चात वाढ आढळते.

७:६:५- दरडोई प्राप्ती व खर्च संदर्भात बागायत गटातील उत्तरदात्याबाबत अध्ययन कालावधीत

अ] पहिल्या गटातील [२.५ एकरपेक्षा कमी] उत्तरदात्याबाबतीत १९७१-७२ व १९८५-८६ साली तूट आढळते. मात्र १९७६-७७ साली वाढावा आढळतो.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकर] उत्तरदात्याबाबत १९७१-७२ साली तूट मात्र १९७६-७७ व १९८५-८६ साली वाढावा आढळतो.

क] तिस-या गटातील [५ एकरापेक्षा जास्त] सातत्याने वाढावा आढळतो.

७:६:६- दरडोई प्राप्ती व खर्च संदर्भात जिरायत गटातील उत्तरदात्याचे बाबतीत अध्ययन कालावधीत -

अ] पहिल्या गटातील [२.५ एकर पेक्षा कमी] उत्तरदात्याचे बाबतीत १९७१-७२ साली वाढावा आढळतो. मात्र १९७६-७७ सन व १९८५-८६ साली तूट आढळते.

ब] दुस-या गटातील [२.५ ते ५ एकर] उत्तरदात्याबाबतीत १९७१-७२ व १९७६-७७ साली वाढावा आढळतो. मात्र १९८५-८६ साली तूट आढळते.

क] तिस-या गटातील [५ एकरा पेक्षा जास्त] उत्तरदात्याचे बाबतीत सातत्याने १९७१-७२ व १९७६-७७ व १९८५-८६ साली वाढावा आढळतो.

## उपाययोजना

१] पोस्ट ऑफिस, टेलिग्राम सुविधा या सार्वजनीक सुविधामध्ये वाढ घडवून आणावी,

२] पिकाच्या आकृतीबंधाबाबतीत शासकिय संशोधनाची गरज आहे. सुधारण क्षेत्र, जमीनीची प्रतवारी, पाण्याची उपलब्धता, आणि सुधारित बी-बीयाणे, खते, किटकनाशक इ. बाबतीचा मागोवा घ्यावा. शेतक-याचे प्रबोधन करावे.

३] कडधान्याचे बाबतीत जी वाढ आढळते त्यामध्ये सुध्दा त्रुटी आढळतात बहुसंख्य शेतकरी बहुविध पिकपध्दतीच्या माध्यमामार्फत कडधान्याचे उत्पादन वाढवतात. ते अशास्त्रीय व अनार्थिक ठरते.

४] एकुण जलसिंचन क्षेत्रफळामध्ये जरी वाढ होत असली तरी पाण्याचा वापर अयोग्य होतो. कीत्येकदा [सरोपाट पध्दतीमुळे] पाणी वाया जाते. म्हणून शेतक-यामध्य पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची जाणिव करून दयावी.

५] पिक पध्दतीच्या ज्ञानाबाबत अद्यापी परंपरागत कृषि पध्दत आढळते. म्हणून

सुधारीत पिक पध्दतीचा अवलंब करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा
६] मिश्रीत पिक पध्दतीमध्ये सुधारणा कराव्यात.
७] खरीप व रब्बी पिकांच्या फेरपालट हा प्रामुख्याने कुटुंब भूधारण क्षेत्राशी निगडित आढळतो. या पार्श्वभूमीवर शेतक-यांमध्ये कृषि ज्ञानाबाबत जाणिव निर्माण करुन घ्यावी.
८] बागायत गटातील उत्तरदात्याकडून उसनवारी /कर्जे ज्यादा घेतली जातात त्याचे विनियोग मात्र अनर्थिक पध्दतीने केला जातो. म्हणून कर्ज विनियोगाची प्रभावी योजना राबवावी.
९] बागायत गटातील उत्तरदात्याकडून शिक्षणावर केलेया खर्चात घट आढळते. अशा अवस्थेत बागायत शेतक-यामध्ये शिक्षणाचे महत्व पटवून देण्याच्या दृष्टीने उपक्रम हाती घ्यावेत.
१०] जिरायत गटातील उत्तरदात्याबाबत अन्य खर्चाबाबत कपात करण्याच्या दृष्टीने जाणिव निर्माण करुन द्यावी.
११] दरडोई प्राप्ती व दरडोई खर्चाच्या संदर्भात बागायत स्तरातील पहील्या व दुस-या गटातील शेतक-यांमध्ये जी तूट आढळते त्याचे प्रमुख कारण म्हणजे अनुत्पादक खर्च अशा अवस्थेत वित्तीय संस्थाकडून कर्जाचा विनियोग कसा होतो याकडे लक्ष दयावे,